**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ४१ दिनांक १५/०८/२०२४**

# स्वातंत्र्य दिनाच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक कार्यालय येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन

आज दि.१५/०८/२०२४ रोजी भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनाचे अनुषंगाने पोलीस अधीक्षक कार्यालय येथे ध्वजारोहण कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रसंगी श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी ध्वजारोहण केले. सदर कार्यक्रमास श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर श्रीमती संगिता शिंदे अल्फोन्सो, पोलीस उप अधीक्षक (गृह), पालघर तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. याप्रसंगी श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी सर्व अधिकारी व अंमलदार यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

सदर प्रसंगी श्री. किशोर सोमनाथ मानभाव, पोलीस निरीक्षक यांनी गडचिरोली या नक्षलग्रस्त भागात काम करुन नक्षलवाद्यांच्या हिंसक व बेकायदेशीर कारवायांना परिणामकारकरित्या आळा घालण्यासाठी विहीत केलेला कालावधी पुर्ण केला असल्याने त्यांना विशेष सेवा पदक प्रदान करण्यात आले आहे. मा. पोलीस अधीक्षक, श्री. बाळासाहेब पाटील यांनी पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देवुन त्यांचा सत्कार केला.

त्यासोबतच केंद्र शासनांतर्गत इयत्ता ०८ वी व ०९ वी चे विदयार्थ्यांकरीता “Student Police cadet programme” कार्यक्रम महाराष्ट्र राज्यात सन २०२३- २०२४ या शैक्षणिक वर्षात राबविण्यात आला असुन सदर कार्यक्रमाअंतर्गत पालघर जिल्हयातील जिल्हा परिषद शाळा, भोईरपाडा, चहाडे, मनोर ता. जि. पालघर या शाळेची कोकण परिक्षेत्रामधुन तृतीय क्रमांक म्हणुन निवड करण्यात आली. त्याअनुषंगाने आज रोजी स्वातंत्र्यदिनानिमीत्त सदर शाळेतील मुख्याध्यापक श्री. संजय पांडुरंग माळी व विद्यार्थी यांना पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देवुन सत्कार करण्यात आला.

पोलीस अधिकारी/अंमलदार व त्यांच्या कुटुंबियांचे चांगले आरोग्याकरीता मा.पोलीस अधीक्षक, श्री. बाळासाहेब पाटील यांच्या संकल्पनेतुन आज दि.१५.०८.२०२४ रोजी सकाळी. १०.०० ते १७.०० वाजेपावेतो पोलीस अधीक्षक कार्यालय येथे आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर आरोग्य शिबीराकीता पालघर जिल्हातील खालील हॉस्पिटल सहभागी झाले होते.

**१. इंन्फिगो आयकेअर हॉस्पिटल, पालघर.**
**२. तुंगा हॉस्पिटल, बोईसर.**
**३. स्माईल सिग्नेचर हॉस्पिटल, पालघर**
**४.अनुग्रह दृष्टिदान.**
**५.चिन्मय हॉस्पिटल, बोईसर**

वरील हॉस्पिटलचे अनुभवी डॉक्टर यांनी प्रत्यक्ष हजर राहुन त्यांनी उच्च रक्तचाप, रक्तदाब, (हायपरटेंशन), मधुमेह, ईसीजी सुविधा संपुर्ण रक्त गणना, महिलांकरीता विशेष आजारांकरीता स्त्रीरोग तज्ञ यांना बोलविण्यात आले होते. याप्रसंगी मा. पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या हस्ते २०० चष्म्यांचे मोफत वाटप करण्यात आले तसेच आवश्यक असलेली औषधे मोफत देण्यात आली. भविष्यकाळात पोलीस व त्यांच्या कुटंबियांचे आरोग्य व्यवस्थित राहावे, आरोग्याविषयी समस्या असणाऱ्यांसाठी पुढील उपचार वेळेच्या आत मिळावे, याकरीता त्यांची माहिती संकलीत करुन त्याअनुषंगाने विशेष उपाययोजना करण्याचे योजले आहे. सदर आरोग्य शिबीराकरीता २१० पेक्षा अधिक पोलीस अधिकारी/अंमलदार व त्यांच्या कुटुंबियांनी सहभाग घेतला होता. सदर आरोग्य शिबीरात एकुण १५ डॉक्टर व १० नर्स यांनी सहभाग नोंदविला. दरम्यान त्यांना मा. पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या हस्ते पुष्पगूच्छ व प्रमाणपत्र देवुन त्यांचा सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रम मा. पोलीस अधीक्षक श्री. बाळासाहेब पाटील, यांच्या संकल्पना व मार्गदर्शनातुन मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. विनायक नरळे, मा. पोलीस उप अधीक्षक (गृह), श्रीमती संगिता शिंदे अल्फोन्सो यांचे मार्गदर्शनाखाली पोनि/रविंद्र नाईक, पोनि/प्रदिप पाटील, सपोनि/सुरेश साळुखे, सपोनि/मल्हार थोरात, मपोउपनि/प्रियंका बुरुंगले, मपोहवा/९५८ एम.आर.वनगा, मपोहवा/लिना गावड, मपोशि/९३ स्वाती गिते, पोशि/४०३ बालाजी कुटे पोशि/१४४४ शामराव कराडे यांनी आरोग्य शिबीर कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला आहे.